20 MAR 2025

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाचे खानापूरला होणार उपकेंद्र

## चंद्रकांत पाटील यांची विधिमंडळात घोषणा : १४१ कोटींची तरतूद

खानापूर, ता. १९ : शिवाजी विद्यापीठाचे उपकेंद्र (उपपरिसर) खानापूर येथेच होणार आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशनात उच्च व तंत्र शिक्षणमंत्री तथा पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी ही घोषणा केली. त्यासाठी १४१ कोटींची तरतूद करणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

विद्यापीठाने यासाठी स्थापन केलेल्या उपसमितीने अभ्यासांती सादर केलेल्या अहवालानुसार हा निर्णय झाला आहे. शिवाजी विद्यापीठाकडून गेल्या २७ फेब्रुवारीस याबाबतचा प्रस्ताव सादर केला होता.



पालकमंत्री पाटील म्हणाले, "खानापूर येथे पायाभूत सुविधा निर्माण करून विद्यार्थ्यांना सर्व प्रशासकीय सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील. या उपकेंद्रातकाल सुसंगत नवीन पदविका, पदवी व पदवीत्तर अभ्यासक्रम सुरू केले जातील. प्राथमिक १४१ कोटींची तरतूद केली असून, हा निधी लवकरच उपलब्ध करून देऊ. उपकेंद्रासाठी खानापूरमधील जागा गट क्रमांक ५७२.१ क्षेत्रफळ ४२.५६ हेक्टर गायरान जागा हस्तांतरित करण्यात येईल. जिल्हाधिकाऱ्यांकडून प्रशासकीय प्रक्रिया झाल्यानंतर जमीन विद्यापीठाकडे हस्तांतरित होईल."

> सांगली जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना या उपकेंद्राचा उपयोग होईल. तेथे कालसुसंगत अभ्यासक्रम राबविल्यामुळे विद्यार्थी अधिक रोजगारक्षम बनविणे शक्य होणार आहे.
>
> **-डॉ. डी. टी. शिर्के,**
> कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

आमदार सुहास बाबर म्हणाले, "२०१३ पासूनची ही प्रक्रिया आता पाठपुराव्यानंतर पूर्णत्वास येत आहे. आता विद्यापीठ प्रशासनाने पुढाकार घ्यावा. तातडीने कामास सुरुवात करावी."

20 MAR 2025 सकाळ जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आता शेतातच समजणार पिकांवरील रोगाचा प्रादुर्भाव

## कृत्रिम बुद्धिमत्ताआधारित 'एअर सॅम्पलर' करणार मदत

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १९ : पिकांवरील रोगाचा प्रादुर्भाव आता शेतातच समजणार आहे. त्यासाठी संशोधनातून कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित एअर सॅम्पलर हे उपकरण शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील संशोधकांनी केले आहे.

विद्यापीठाशी संलग्नित फलटण एज्युकेशन सोसायटीच्या श्रीमंत मैयासाहेब राजेमाने महाविद्यालय, म्हसवड येथील डॉ. सुजित जाधव, कृष्णा महाविद्यालय, रेठरे येथील डॉ. सुनीता जाधव, विद्यापीठाच्या बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राचे सहायक ग्रंथपाल डॉ. शिवराज थोरात, लंडनच्या क्विन्स मेरी युनिव्हर्सिटीत एम.एस. (ए.आय.) चे शिक्षण घेत असलेले ऋतुराज जाधव आणि राजारामबापू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, इस्लामपूर येथे बी.ई. (इलेक्ट्रिकल) चे शिक्षण घेत असलेले पृथ्वीराज जाधव यांनी या संदर्भातील संशोधन केले आहे. त्यांच्या 'ए.आय. बेस्ड डिव्हाईस फॉर डिटेक्शन ऑफ प्लांट डिसिजेस' या संशोधनाला भारत सरकारच्या पेटंट कार्यालयाकडून पेटंट जाहीर झाले आहे.


शिवराज थोरात


सुनीता जाधव


ऋतुराज जाधव


पृथ्वीराज जाधव


सुजित जाधव

विविध पिकांवर सापडणारे आणि हवेतून संक्रमण करू शकणारे वेगवेगळ्या रोगांचे विषाणू शोधण्यासाठी आणि ओळखण्यासाठी टिळक एअर सॅम्पलर वापरला जातो. हे सॅम्पलर शेतात ठेवून सॅम्पल गोळा केले जातात आणि नंतर प्रयोगशाळेमध्ये आणून तज्ज्ञांच्या मदतीने ओळखले जातात, अशी आजपर्यंतची प्रक्रिया आहे. तथापि, या नवीन संशोधनानुसार टिळक सॅम्पलरमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर केल्यामुळे शेतकऱ्यांना शेतामध्येच पिकांवर कोणत्या प्रकारच्या रोगाचा प्रादुर्भाव झाला आहे, हे ओळखता येईल आणि त्यानुसार त्वरित उपाययोजना करता येतील, असे डॉ. थोरात यांनी सांगितले.

> 'एअर सॅम्पलरचे संशोधन नावीन्यपूर्ण आणि शेतकऱ्यांना उपयुक्त असून, या संशोधनाचे डिझाईन पेटंट संशोधकांना मिळाले आहे. पुढील काळात त्यावर उपयुक्तता पेटंटही मिळविण्याचा मानस आहे.'
>
> \- डॉ. शिवराज थोरात

20 MAR 2025

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# बांधावरच कळणार पिकांवरील रोग

## एआय आधारित उपकरण संशोधनाला शिवाजी विद्यापीठाला मिळाले पेटंट

कोल्हापूर : प्रतिनिधी

कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून मानवी जीवन अधिकाधिक सुखकर करण्याचे प्रयत्न जगात सर्वदूर सुरू आहेत. त्यामध्ये आता शिवाजी विद्यापीठाशी संबंधित संशोधकांचाही समावेश झाला आहे. या संशोधनामुळे शेतात उभ्या पिकांवर कोणत्या रोगांचा प्रादुर्भाव झालेला आहे, हे थेट शेतामध्येच लगेच समजणार आहे. या अभिनव संशोधनाला भारत सरकारचे पेटंट प्राप्त झाले आहे.



शिवाजी विद्यापीठाशी संलग्नित फलटण एज्युकेशन सोसायटीच्या श्रीमंत भैयासाहेब राजेमाने महाविद्यालय, म्हसवड येथील डॉ. सुजित जाधव, कृष्णा महाविद्यालय, रेठरे येथील डॉ. सुनीता जाधव, विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राचे सहायक ग्रंथपाल डॉ. शिवराज थोरात, लंडनच्या क्विन्स मेरी युनिव्हर्सिटीत एम.एस. (ए.आय.)चे शिक्षण घेत असलेले ऋतुराज जाधव आणि राजारामबापू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, इस्लामपूर येथे बी.ई. (इलेक्ट्रिकल)चे शिक्षण घेत असलेले पृथ्वीराज जाधव यांनी या संदर्भातील संशोधन केले आहे. त्यांच्या 'ए.आय. बेस्ड डिव्हाईस फॉर डिटेक्शन ऑफ प्लांट डिसिजेस' या संशोधनाला भारत सरकारच्या पेटंट कार्यालयाकडून पेटंट जाहीर करण्यात आले आहे.

यासंदर्भात डॉ. थोरात यांनी दिलेल्या माहितीनुसार,



डॉ. शिवराज थोरात



डॉ. सुजित जाधव



सुनीता जाधव



पृथ्वीराज जाधव



ऋतुराज जाधव

विविध पिकांवर सापडणारे आणि हवेतून संक्रमण करू शकणारे वेगवेगळ्या रोगांचे विषाणू शोधण्यासाठी आणि ओळखण्यासाठी टिळक एअर सॅम्पलर वापरला जातो. हे सॅम्पलर शेतात ठेवून सॅम्पल गोळा केले जातात आणि नंतर प्रयोगशाळेमध्ये आणून तज्ज्ञांच्या मदतीने ओळखले जातात, अशी आजपर्यंतची प्रक्रिया आहे. नवीन संशोधनानुसार टिळक सॅम्पलरमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर केल्यामुळे शेतकऱ्यांना शेतामध्येच पिकांवर कोणत्या प्रकारच्या रोगाचा प्रादुर्भाव झाला आहे, हे ओळखता येईल आणि त्यानुसार त्वरित उपाययोजना करता येतील. अशा पद्धतीचे हे नावीन्यपूर्ण आणि शेतकऱ्यांना उपयुक्त असे संशोधन आहे. या संशोधनाचे डिझाईन पेटंटवरील संशोधकांना मिळाले असून, पुढील काळात त्यावर उपयुक्त पेटंट देखील मिळवण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला.

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. सुरेश भोसले, कृष्णा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सी. बी. साळुंखे, फलटण एज्युकेशन सोसायटीचे सचिव श्रीमंत संजीवराजे नाईक-निंबाळकर, प्राचार्य डॉ. संजय दीक्षित यांनी सर्व संशोधकांचे अभिनंदन केले.

20 MAR 2025
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आता शेतातच समजणार पिकांवरील रोगाचा प्रादुर्भाव

## कृत्रिम बुद्धिमत्ताआधारित उपकरण संशोधनाला मिळाले पेटंट : शेतकऱ्यांना उपयुक्त संशोधन


डॉ. सुजीत जाधव


डॉ. शिवराज थोरात


डॉ. सुनीता जाधव


पृथ्वीराज जाधव


ऋतुराज जाधव

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून मानवी जीवन अधिकाधिक सुखकर करण्याचे प्रयत्न जगात सर्वदूर सुरू आहेत. त्यामध्ये आता शिवाजी विद्यापीठाशी संबंधित संशोधकांचाही समावेश झाला आहे. या संशोधनामुळे शेतात उभ्या पिकांवर कोणत्या रोगांचा प्रादुर्भाव झालेला आहे, हे थेट शेतामध्येच समजणार आहे.या अभिनव संशोधनाला भारत सरकारचे पेटंट प्राप्त झाले आहे.

शिवाजी विद्यापीठाशी संलग्नित फलटण एज्युकेशन सोसायटीच्या श्रीमंत भैय्यासाहेब राजेमाने महाविद्यालय, म्हसवड येथील डॉ.सुजीत जाधव, कृष्णा महाविद्यालय, रेठरे येथील डॉ. सुनीता जाधव, विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राचे सहाय्यक ग्रंथपाल डॉ. शिवराज थोरात, लंडनच्या क्विन्स मेरी युनिव्हर्सिटीत एम.एस. (ए.आय.)चे शिक्षण घेत असलेले ऋतुराज जाधव आणि राजारामबापू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, इस्लामपूर येथे बी.ई. (इलेक्ट्रीकल)चे शिक्षण घेत असलेले पृथ्वीराज जाधव यांनी या संदर्भातील संशोधन केले आहे. त्यांच्या 'ए.आय. बेस्ड डिव्हाईस फॉर डिटेक्शन ऑफ प्लांट डिसिजेस' या संशोधनाला भारत सरकारच्या पेटंट कार्यालयाकडून पेटंट जाहीर करण्यात आले आहे.

विविध पिकांवर सापडणारे आणि हवेतून संक्रमण करू शकणारे वेगवेगळ्या रोगांचे विषाणू शोधण्यासाठी आणि ओळखण्यासाठी टिळक एअर सॅम्पलर वापरला जातो. हे सॅम्पलर शेतात ठेवून सॅम्पल गोळा केले जातात आणि नंतर प्रयोगशाळेमध्ये आणून तज्ज्ञांच्या मदतीने ओळखले जातात, अशी आजपर्यंतची प्रक्रिया आहे. तथापि, सदर नवीन संशोधनानुसार टिळक सॅम्पलरमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर केल्यामुळे शेतकऱ्यांना शेतामध्येच पिकांवर कोणत्या प्रकारच्या रोगाचा प्रादुर्भाव झाला आहे, हे ओळखता येईल आणि त्यानुसार त्वरित उपाययोजना करता येतील.अशा पद्धतीचे हे नावीन्यपूर्ण आणि शेतकऱ्यांना उपयुक्त संशोधन आहे. त्यावर उपयुक्तता पेटंट देखील मिळविण्याचा मानस डॉ. थोरात यांनी व्यक्त केला.

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.डी.टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ.पी.एस.पाटील, कुलसचिव डॉ. व्ही.एन.शिंदे, शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. सुरेश भोसले,कृष्णा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सी.बी.साळुंखे, फलटण एज्युकेशन सोसायटीचे सचिव श्रीमंत संजीवराजे नाईक-निंबाळकर, प्राचार्य डॉ. संजय दीक्षित यांनी सर्व संशोधकांचे अभिनंदन केले आहे.

20 MAR 2025 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शेतातच समजणार पिकांवरील रोगाचा प्रादुर्भाव

## कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित उपकरण संशोधनाला मिळाले पेटंट

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शेतात उभ्या पिकांवर कोणत्या रोगांचा प्रादुर्भाव झालेला आहे, हे थेट शेतामध्येच लगेच समजणार आहे. या अभिनव संशोधनाला भारत सरकारचे पेटंट प्राप्त झाले आहे. शिवाजी विद्यापीठाशी संलग्न असणाऱ्या महाविद्यालय तसेच प्राध्यापक व संशोधक विद्यार्थ्यांना याचे पेटंट मिळाले आहे.

म्हसवड येथील डॉ. सुजित जाधव, कृष्णा महाविद्यालय, रेठरे येथील डॉ. सुनीता जाधव, विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राचे सहायक ग्रंथपाल डॉ. शिवराज थोरात, लंडनच्या क्विन्स मेरी युनिव्हर्सिटीत एम.एस.चे (ए.आय.) शिक्षण घेत असलेले ऋतुराज जाधव आणि राजारामबापू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, इस्लामपूर येथे बी.ई.चे (इलेक्ट्रिकल) शिक्षण घेत असलेले पृथ्वीराज जाधव यांनी यासंदर्भातील संशोधन केले आहे. त्यांच्या 'ए.आय. बेस्ड डिव्हाईस फॉर डिटेक्शन ऑफ प्लांट डिसिजेस' या संशोधनाला भारत सरकारच्या पेटंट कार्यालयाकडून पेटंट जाहीर करण्यात आले आहे.

डॉ. थोरात म्हणाले, विविध पिकांवर सापडणारे आणि हवेतून संक्रमण करू शकणारे वेगवेगळ्या रोगांचे विषाणू शोधण्यासाठी आणि ओळखण्यासाठी टिळक एअर सॅम्पलर वापरला जातो. हे सॅम्पलर शेतात ठेवून सॅम्पल गोळा केले जातात. नंतर प्रयोगशाळेमध्ये आणून तज्ज्ञांच्या मदतीने ओळखले जातात, अशी आजपर्यंतची प्रक्रिया आहे. नवीन संशोधनानुसार शेतकऱ्यांना शेतामध्येच पिकांवर कोणत्या प्रकारच्या रोगाचा प्रादुर्भाव झाला आहे, हे ओळखता येईल. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. सुरेश भोसले, कृष्णा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सी. बी. साळुंखे, फलटण एज्युकेशन सोसायटीचे सचिव श्रीमंत संजीवराजे नाईक निंबाळकर, प्राचार्य डॉ. संजय दीक्षित यांनी संशोधकांचे अभिनंदन केले.

20 MAR 2025 लोकसत्ता
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'डिजिटल मीडिया उद्योग' वर दोन दिवसीय कार्यशाळा

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठातील पत्रकारिता, जनसंवाद विभाग, पंतप्रधान उच्चतर शिक्षण अभियान अंतर्गत 'डिजिटल मीडिया उद्योगः नवे प्रवाह' या विषयावर २० व २१ मार्च रोजी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

याचे उद्‌घाटन 'डिजिटल मीडिया उद्योग आणि डिजिटल संघटनेचे अध्यक्ष, ज्येष्ठ संपादक, राजा माने यांच्या हस्ते, ज्येष्ठ संपादक डॉ. दशरथ पारेकर यांच्या अध्यक्षस्तेखाली होणार आहे. मोफत नोंदणी असून विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात येणार आहे, अशी माहिती विभागाच्या प्रमुख प्रा. डॉ. निशा पवार यांनी मंगळवारी दिली. समन्वयक, डॉ. चंद्रशेखर वानखेडे व डॉ. शिवाजी जाधव आहेत.

20 MAR 2025 तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठातील भुयारी मार्गाने प्रवास सुकर

- शिक्षक, विद्यार्थी, कर्मचाऱ्यांकडून भुयारी मार्गाबद्दल समाधान
- पादचाऱ्यांसाठी फुटपाथ

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या पूर्व व पश्चिम परिसरांना कायमस्वरुपी जोडणाऱ्या भुयारी मार्गाने दुचाकीस्वार व पादचाऱ्यांची चांगली सोय झाली. ८ फेब्रुवारीपासून या मार्गाचा वापर केला जात असून विद्यार्थी व प्राध्यापकांकडून समाधान व्यक्त केले. या मार्गासाठी शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने साडेआठ कोटी रुपये मंजूर केले होते. कुलगुरू डॉ. शिर्के यांनी कुशलतेने हा निधी आणून वर्षात काम पूर्ण केले.

शिवाजी विद्यापीठातील भुयारी मार्गाने तीन मीटर उंचीपर्यंतची वाहने जाऊ शकतात. त्यापेक्षा जास्त उंचीची वाहने आत जाऊ नये म्हणून दोन्ही बाजूला गार्ड लावले. हा मार्ग हलकी वाहने व पादचारी यांच्यासाठी उपयुक्त ठरत आहे. पादचाऱ्यांसाठी संपूर्ण लांबीचा फुटपाथ तयार केला असून त्याचा पुरेपूर वापर केला जात आहे. भुयारी मार्गातून जाणाऱ्या वाहनांमुळे पादचाऱ्यांना इजा होवू नये याकरिता पादचारी मार्गाच्या बाजूने रेलींग केल्याने पादचाऱ्यांचा संपूर्ण प्रवास सुरक्षितपणे होत आहे. संपूर्ण भुयारी मार्गाला रात्रीच्यावेळेला पुरेसा उजेड मिळावा याकरिता लाईटची तरतुद केली असून, त्याला मोशन सेंसर बसवण्यात आले आहेत, त्यामुळे दुचाकी आल्यानंतर आपोआप लाईट लागते. इतिहास, शिक्षणशास्त्र, मास कम्युनिकेशन, डीओटी, जर्नालिझम, राजर्षी शाहू संशोधन केंद्र यासह अन्य अधिविभागातील विद्यार्थी, कर्मचारी, शिक्षक यांना हा मार्ग सोयीचा ठरत आहे.



विद्यापीठाच्या पूर्व व पश्चिम परिसराला जोडणारा भुयारी मार्ग.

20 MAR 2025 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने शाश्वत शेती शक्य

## नेताजी पाटील : शिवाजीराव देसाई स्मृती व्याख्यानमाला

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिक्षित तरुणाईने नोकरी करावी व अशिक्षित तरुणाईने शेती करावी, अशा प्रकारचे वातावरण समाजामध्ये सध्या निर्माण झाले असून, सध्याची शेती पारंपरिक पद्धतीने सुरू आहे. त्यामुळे आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहकार्याने शाश्वत शेती शक्य आहे, असे मत दुधसाखर महाविद्यालयातील प्रा. डॉ. नेताजी पाटील यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठ व केआयटी अभियांत्रिकी (प्रदत्त स्वायत्त) महाविद्यालयाच्या वतीने उद्योग भूषण कै. शिवाजीराव देसाई स्मृती व्याख्यानमालेत ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाच्या इनोवेशन इन्क्युबेशनचे संचालक डॉ. सागर डेळेकर होते.

> उपलब्ध असलेल्या शेतीच्या व शेतीपूरक व्यवसायातून मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती होणे गरजेचे : डेळेकर

डॉ. पाटील म्हणाले, शेतीला दुय्यम दर्जा देण्याचा प्रयत्न गेल्या काही वर्षात समाजामध्ये निर्माण झाला आहे. तरुणाईलाही शेतीबाबत फार आश्वासक परिस्थिती दिसत नसल्यामुळे ही शिक्षित पिढी नोकरीच्या शोधात बाहेर पडत आहे.

डॉ. सागर डेळेकर म्हणाले, भारतासारख्या शेतीप्रधान देशांमध्ये उपलब्ध असलेल्या शेतीच्या व शेती पूरक व्यवसायातून मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती केली पाहिजे. यावेळी शशिताई देसाई, संस्थेचे अध्यक्ष साजिद हुदली, डॉ. मोहन वनरोट्टी, डॉ. दत्तात्रय साठे उपस्थित होते. डॉ. दीप्ती कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. अमर टिकोळे यांनी आभार मानले.



शिवाजी विद्यापीठ व केआयटी आयोजित कै. शिवाजीराव देसाई स्मृती व्याख्यानमालेमध्ये डॉ. नेताजी पाटील यांनी मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. मोहन वनरोट्टी, डॉ. सागर डेळेकर, साजिद हुदली व शशिताई देसाई उपस्थित होते.

20 MAR 2025
सकाळ
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# स्थानिक गरजा लक्षात घेऊन संशोधन व्हावे

## सिद्धार्थ शिंदे; विद्यापीठात 'सृजनात्मक विचारांची शिक्षण पद्धती' कार्यशाळा

कोल्हापूर, ता. १९ : संशोधकांनी स्थानिक गरजा लक्षात घेऊन त्यांची पूर्तता करण्याच्या दिशेने आपले संशोधन केंद्रित करावे. त्याचप्रमाणे शाश्वत विकास डोळ्यांसमोर ठेवून आपली सृजनशीलता वापरावी', असे आवाहन शिवाजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे राज्यपाल नियुक्त सदस्य सिद्धार्थ शिंदे यांनी केले.

विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र अधिविभागात प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियानांतर्गत (पीएम-उषा) संशोधक व पदव्युत्तर पदवीच्या विद्यार्थ्यांसाठी 'सृजनात्मक विचारांची शिक्षण पद्धती' या विषयावरील



सिद्धार्थ शिंदे

दोनदिवसीय कार्यशाळेच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन होते.

'समाजाचा पैसा समाजोपयोगी संशोधनासाठी खर्च व्हावा. विद्यापीठासारख्या ठिकाणी स्थानिक समस्यांवर आधारित संशोधन व्हावे. स्थानिक गरजांनुरूप अभ्यासक्रमांमध्ये देखील त्याचा अंतर्भाव व्हावा', अशी अपेक्षा शिंदे यांनी व्यक्त केली.

'शिक्षकांमध्ये सृजनशील विचारसरणी असेल, तर तो विद्यार्थ्यांसाठी, उद्यमशील समाजासाठी प्रेरणादायी ठरतो. आज शिक्षणक्षेत्रावर ही सृजनशीलता घडविण्याची मोठी जबाबदारी असल्याचे डॉ. महाजन यांनी सांगितले. यावेळी सारिका पाटील, श्रीराम सोनवणे, आनंदा कुंभार, अर्चना कुराडे, अंजली गायकवाड, ममता घोटल, संजय चव्हाण, अतुल जाधव उपस्थित होते. डॉ. चेतना सोनकांबळे यांनी स्वागत केले. डॉ. विद्यानंद खंडागळे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. रूपाली संकपाळ यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
लोकमत
20 MAR 2025

# भारतीय अर्थव्यवस्थेसाठी मान्सूनविषयी संशोधन महत्त्वाचे : सुनील पवार

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** मान्सून हा भारतीय अर्थव्यवस्थेचा सर्वाधिक महत्त्वाचा स्रोत आहे. त्यामुळे त्याविषयी अभ्यास आणि संशोधन महत्त्वाचे ठरते, असे प्रतिपादन पुण्याच्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ ट्रॉपिकल मेट्रोलॉजीचे वरिष्ठ हवामानशास्त्रज्ञ डॉ. सुनील पवार यांनी येथे केले.

शिवाजी विद्यापीठात 'हवामान बदल आणि भारतीय मान्सून' या विषयावरील एकदिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटन समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. विद्यापीठाचा भूगोल अधिविभाग, हवामान बदल आणि शाश्वत केंद्र, पर्यावरण शास्त्र विभाग, संख्याशास्त्र अधिविभाग आणि पतंगराव कदम महाविद्यालय, सांगली यांच्यातर्फे ही कार्यशाळा झाली. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के अध्यक्षस्थानी होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, विद्यापीठाचे पन्हाळा येथील अवकाश संशोधन केंद्र आणि भूगोल अधिविभाग येथे आयआयटीएम काही अत्याधुनिक उपकरणे बसवणार आहे. त्या डेटाचाही संशोधन व विश्लेषणासाठी उपयोग होईल. यावेळी भारती विद्यापीठाचे डॉ. दादा नाडे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. डॉ. सचिन पन्हाळकर यांनी प्रास्ताविक केले. डॉ. आसावरी जाधव यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. डॉ. शशीभूषण महाडिक यांनी आभार मानले. आयआयटीएमचे प्रसिद्ध हवामानशास्त्रज्ञ डॉ. हाफजा वरिकोडण, डॉ. सुरज के. पी. आणि डॉ. प्रशांत पिल्लई यांनी मान्सूनवरील हवामान बदलाचा प्रभाव, संभाव्य परिणाम आणि त्यावरील वैज्ञानिक उपाययोजनांबाबत मार्गदर्शन केले.

20 MAR 2025

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आंतरविद्याशाखीय अभ्यासातून समग्रतेचा शोध शक्य

## डॉ. दिलीप चव्हाण : नाइट कॉलेजच्या वतीने चर्चासत्र

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : आंतरविद्याशाखीय अभ्यास म्हणजे दोन किंवा अधिक विषयांतील परस्परसंबंध उलगडून दाखवणे नव्हे, तर वर्तमान मांडणीची नव्याने पुनर्मांडणी करणे होय. त्यासाठी वर्तमान व्यवस्थेला सतत प्रश्न विचारावे लागतील. व्यवस्थेला प्रश्नांकित करूनच आपण आंतरविद्याशाखीयतेकडे जाऊ शकतो, असे मत स्वामी रामानंद तीर्थ



कोल्हापुरातील शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, नाइट कॉलेजतर्फे आयोजित चर्चासत्रात डॉ. दिलीप चव्हाण यांनी मार्गदर्शन केले.

मराठवाडा विद्यापीठातील भाषा, साहित्य आणि संस्कृती अभ्यास संकुलाचे प्रमुख डॉ. दिलीप चव्हाण यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ आणि नाइट कॉलेजच्या वतीने आयोजित 'भाषा आणि साहित्य अभ्यासाचे आंतरविद्याशाखीय स्वरूप' या विषयावरील दोनदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्घाटनप्रसंगी डॉ. चव्हाण बोलत होते. कौन्सिल ऑफ एज्युकेशनच्या अध्यक्षा रजनीताई मगदूम अध्यक्षस्थानी होत्या. याप्रसंगी कौन्सिल ऑफ एज्युकेशनचे संचालक ॲड. अमित बाडकर, 'शिविम'चे अध्यक्ष डॉ. भरत जाधव, सचिव डॉ. मांतेश हिरेमठ, अधिवेशनाचे अध्यक्ष डॉ. गोपाळ गावडे, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. रणधीर शिंदे, प्राचार्य डॉ. उत्तम पाटील, मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. अरुण शिंदे, डॉ. नंदकुमार कुंभार उपस्थित होते. यावेळी डॉ. विश्वनाथ मगदूम, डॉ. गोपाळ गावडे, डॉ. रघुनाथ कडाकणे, डॉ. बाळासाहेब गणपाटील, डॉ. अवनीश पाटील, डॉ. उदय पाटील, सारिका उबाळे, डॉ. शरद भुताडिया, डॉ. माया पंडित यांनी मार्गदर्शन केले. ह.भ.प. ज्ञानेश्वर बंडगर, संपत देसाई, फारुक काझी, डॉ. संजय साठे, डॉ. गौतम काटकर, डॉ. सुखदेव एकल, डॉ. महेश गायकवाड यांनी शोधनिबंधांचे वाचन केले. ज्येष्ठ साहित्यिक प्राचार्य डॉ. सुनीलकुमार लवटे हे समारोप समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.